# नारायण मेघाजी लोखंडे

## प्रास्ताविक

महाराष्ट्रात सुधारणा युग सुरु झाले याची सुरुवात करणाऱ्या सुधाराकां पैकी एक महत्त्वाचे सुधारक आहेत नारायण मेघाजी लोखंडे. भारतात आधुनिक विचार व त्यानुषंगाने चळवळीची पायाभरणीचा हा काळ होता. मुंबई वाढू लागली होती. देशात औद्योगिकीकरणाला संथपणे सुरुवात झाली होती. त्यामुळे कामगार वर्ग हळूहळू वाढू लागला होता. याकाळात म.फुले यांचे शिष्य, सहकारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी केलेले कार्य मोलाचे आहे. हे कार्य इतके मोलाचे आहे की, नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतीय कामगार संघटना चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते.

१८४८ मध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांचा जन्म खेड तालुक्यातील कन्हेरसर या गावी झाला. फळ,फुले व भाजी विकून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असे. नारायण लोखंडे यांचे वडील या व्यवसायानिमित्ताने ठाण्यात स्थाईक झाले. नारायण लोखंडे यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण ठाण्यातच झाले. त्यानंतर त्यांनी कौटुंबिक गरजेतून नोकरी स्वीकारली.लोखंडे आधी रेल्वेत व नंतर पोस्ट खात्यात नोकरीस होते. लोखंडे यांच्या पत्नीचे नाव गोपिकाबाई तर मुलाचे नाव गोपीनाथ होते. पुढे लोखंडे मुंबईच्या (मांडवी) एका कापड गिरणीत भांडारपाल म्हणून ते काम करू लागले. यावेळी त्यांनी कामगारांची दुखे व शोषण जवळून पहिली. त्यामुळे त्यांनी नोकरी सोडून या उपेक्षितांच्या न्याय्य हक्कासाठी लढण्यास सुरुवात केली.कामगार सुधारणेबरोबरच त्यांनी विविध सामाजिक सुधारणाचाही पुरस्कार केला. लोखंडे यांचे सुधारणा विषयक विचार व कार्य पुढीलप्रमाणे ....

## नारायण मेघाजी लोखंडे यांचे विचार व कार्य

### १) सत्यशोधक चळवळीत काम

१८७३ मध्ये म.फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. नारायण मेघाजी लोखंडे यांना या समाजाची माहिती मिळाल्यानंतर ते समाजाचे सदस्य व समाजाच्या चळवळीत १८७४ पासून सामील झाले. लोखंडे म फुले यांचे महत्त्वपूर्ण सहकारी होते. म. फुले यांच्या मार्गदर्शनात लोखंडे यांनी विविध स्वरूपाचे मोलाचे कार्य केले. सत्यशोधक समाजाच्या मुंबई शाखेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केला.

### २) दीनबंधू व सुधारणांचा पुरस्कार

१८७७ मध्ये कृष्णराव भालेकर यांनी सत्यशोधकी विचारांचे दीनबंधू हे मुखपत्र पुण्यात सुरु केले होते. परंतु हे वृत्तपत्र बंद पडले. लोखंडे व रामजी संतूजी आवटे यांनी या वृत्तपत्राची जबाबदारी घेतली. त्यावरील कर्जाची जबाबदारीही स्वीकारली. लोखंडे यांनी हे वृत्तपत्र मुंबईतून १८८० पासून सुरु केले व त्याचे व्यवस्थापन ते पाहू लागले. ९ मे १८८० रोजी मुंबईतून दीनबंधूचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. पुढे आवटेही यापासून दुरावले, या

नियतकालिकाची मुख्य संपादकीय जबाबदारी लोखंडे यांची होती. नियतकालिकाचे स्थळ व संपादक व्यवस्थापक बदलले तरी त्यांचा हेतू व कार्य कायम राहिले. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतही धोरण बदलले नाही. या वृत्तपत्राच्या मुखपृष्ठावर 'कष्टकरी वर्गाच्या हितासाठी समर्पित वृत्तपत्र' (Journal Devoted to the Interest of Working Class) असे घोषवाक्य छापलेले असे. या नियतकालिकामधून शेतकरी कामकरी वर्गाची बाजू हिरिरीने मांडली जाऊ लागली. वृत्तपत्रात लोखंडे बोलीभाषेचा उपयोग करत व अत्यंत परखडपणे आपली मते नोंदवत. सामन्यांच्या भाषेतील संवादी लेखनामुळे त्याचा मोठा प्रभाव पडत असे.या कष्टकर्याच्या हालअपेष्टां, दुःखाला वाचा फोडून सरकारचे व जनतेचे लक्ष वेधून घेण्याचे काम दीनबंधूने केले. सक्तीचे शिक्षण, दारूबंदी, मागासांसाठी नोकरीत आरक्षण, विद्यार्थ्यांना सवलती, शेतकऱ्यांना जंगलच्या कायद्यामुळे होणारा त्रास, विधवांच्या केशवपनास बंदी वगैरे अनेक प्रश्नांना लोखंडे यांनी दीनबंधू ह्या मुखपत्रातून वाचा फोडली. रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीची दुर्दशा झाली असल्याचा पहिला आवाज दीनबंधूने उठविला होता. थोडक्यात अनेक प्रश्नांकडे दीनबंधूच्या माध्यमातून लोखंडे यांनी समाज व सरकारचे लक्ष वेधून घेतले. लोखंडे यांनी गुराखी या नावाचे एक दैनिकही काढले होते. या दैनिकातून त्यांनी कामगारांच्या समस्यांवर प्रकाश टाकला. थोडक्यात त्यांनी वृत्तपत्रास सुधारणांचे माध्यम व चळवळीची ताकद म्हणून वापरले.

### ३) उपेक्षितांसाठी संघटीत लढा

नारायण मेघाजी हे म.फुले यांचे शिष्य होते. म.फुले यांच्या मानवतावादी विचारांचा प्रभाव लोखंडे यांच्यावर होता. त्यांनी म.फुले यांच्या मार्गदर्शनात उपेक्षित, वंचितांच्या न्याय हक्कासाठी आवाज उठविला. फुले व त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर आणि लोखंडे यांनी शेतकरी आणि कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न केला त्यापूर्वी या वर्गाच्या प्रश्नाकडे कोणत्याही संघटनेने लक्ष दिले नव्हते. नारायण मेघाजी लोखंडे यांनी अनेक संस्थांच्या स्थापनेत व कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन बरोबरच मराठा ऐक्ये सभा, मराठा रिलीफ फंड, सुशिक्षण ग्रह अशा अनेक संस्थांचे काम त्यांनी केले. शिवस्मारक जीर्णोद्धार समितीच्या स्थापनेसाठी त्यांनी प्रयत्न केले होते.

### ४) कामगार संघटना स्थापना

लोखंडे यांना कामगारांबद्दल खूप आस्था होती. त्यांनी स्वत:ला पूर्णपणे कामगार, समाज सेवेत वाहून घेतले होते. नारायण लोखंडे स्वत: कामगार वस्तीत राहिले. मुंबईतील कापड कामगारांच्या सभां आयोजित केल्या. या सभांना म.फुले यांचेही मार्गदर्शन लाभले. लोखंडे यांचे कष्ट, संघटन यामुळे भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन झाली. या संघटनेच्या स्थापनेचे श्रेय लोखंडे यांना आहे. २३ सप्टेंबर १८८४ रोजी लोखंडे यांनी बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन स्थापन केली. कामगारांना संघटीत करणे व त्यांच्या समस्या मालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही संघटना स्थापन करण्यात आली होती. त्याकाळात शिक्षणाचा अभाव

असताना अज्ञानी मागास असंघटीत कष्टकऱ्याना हक्क,कर्तव्य यांची जाणीव करून देत त्यांना संघटीत करण्याचे अवघड काम लोखंडे यांनी पार पडले. लोखंडे यांचे कार्य यशस्वी होत गेले. कामगार संघटीत शक्ती वाढू लागली.त्यांची चळवळ विस्तारू लागली. कामगार हित जोपासले जाऊ लागले याचे सर्व श्रेय एका अर्थाने लोखंडे यांना आहे. म्हणूनच नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतातील ट्रेड युनियन चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते.

### ५) कामगार प्रश्न सोडवणूक

लोखंडे यांच्यामुळे गिरणी कामगारांना अनेक हक्क मिळाले. गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळाली. त्याप्रमाणेच इतरही अनेक मागण्यासाठी लोखंडे यांनी लढा दिला होता. १८८१ च्या फॅक्टरी ॲक्टमध्ये सुधारणासाठी १८८४ मध्ये कलेक्टर डब्ल्यू बी मुलक नेतृत्त्वात स्थापन केलेल्या कमिशनला त्यांनी आपल्या मागण्या सादर केल्या त्यात पुढील बाबींचा समावेश होता. दुपारी कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी, मिल सायंकाळी सूर्यास्तानंतर बंद करावी, कामगारांचा पगार दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत झाला पाहिजे, कामावर दुखापत झाल्यास पूर्ण पगार मिळाला पहिजे किंवा कामावर अपघाती मृत्यू झाल्यास कुटुंबाला पेन्शन मिळाली पाहिजे. अशा अनेक मागण्या त्यांनी केल्या होत्या. संघटनेच्या माध्यमातून त्यांनी यासाठी लढा उभारला. त्यासाठी संप, निदर्शने केली. आपल्या मागण्या सरकार पर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी यावेळी दोन सभा घेतल्या होत्या. २३ सप्टेंबर १८८४ रोजी परळ (सुपारीबाग) येथे व २६ सप्टेंबर १८८४ रोजी भायखळा येथे लोखंडेयांच्या अध्यक्षतेत सभा झाल्या. हजारो कामगार यात सहभागी झाले होते. कामगारांच्या सह्यांचे निवेदन यावेळी कमिशनला देण्यात आले. लोखंडे यांच्या कार्यामुळेच सरकारला कारखाना कायद्यात सुधारणा कराव्या लागल्या. कामगारांना महिन्यातून चार पगारी रजा द्याव्या लागल्या.

### ६) मागण्यांचा पाठपुरावा व साप्ताहिक सुट्टी

लोखंडे यांनी सभा घेऊन लोकांची मानसिकता घडवून, सरकला निवेदन देऊन सुधारणासाठी प्रयत्न केला. परंतु सरकार याकडे दुर्लक्ष करत होते. त्यामुळे पुन्हा कामगार सह्यांचे निवेदन देण्यात (२० नोव्हेंबर १८८९) देण्यात आले. एवढे करून लोखंडे थांबले नाही तर त्यांनी त्यासाठी तीव्र आंदोलन उभे केले. २४ एप्रिल १८९० रोजी महालक्ष्मीच्या रेसकोर्स मैदानावर कामगारांची सभा आयोजित केली. हि सभा ऐतिहासिक ठरली. या सभेला १० हजारपेक्षा जास्त कामगार उपस्थित होते. यात स्त्रियांनीही भाषणे केली. ही सभा अत्यंत परिणामकारक होती. सरकारनेही मागण्या मान्य करण्यास अनुकूल भूमिका घेतली. लोखंडे यांनी कामगारांचे कामाचे तास निश्चित व योग्य असावे अशी भूमिका घेतानाच आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांना साप्ताहिक सुटी मिळावी यासाठी लढा दिला. त्यांच्या लढ्याला यश मिळाले. भारतीय कामगार आयोगाने अखेर ही मागणी स्वीकारली व १० जून १८९० पासून रविवार ही अधिकृत साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली. कष्टकऱ्याचा हा पहिला महत्त्वपूर्ण विजय असल्याने चळवळीचा आत्मविश्वासही वाढला. पुढेही लोखंडे यांनी

आपले कार्य अधिक जोमाने सुरु ठेवले. पुढे 1891 च्या फॅक्टरी ॲक्टची प्रत्यक्ष अंमलबजावणी जानेवारी १८९२ मध्ये सुरु झाली. या कायद्यासाठी लोखंडे यांच्या सहकार्याची नोंद कमिशनने आपल्या अहवालात केली आहे. लोखंडे यांनी बाल मजुरीस विरोध केला. कमी वयाच्या कामगारांच्या व स्त्री कामगारांच्या कामाच्या तासात कपात व्हावी व शिक्षणाची संधी त्यांना द्यावी यासाठीही लोखंडे यांनी पाठपुरावा केला.

**७) शिक्षणाचा पुरस्कार**

लोखंडे यांनी म फुले यांचे विचार पुढे नेण्याचे काम केले. साहजिकच त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांच्या प्रसाराठी प्रयत्न केले. दीनबंधू मधून बहुजन समाजासाठी मोफत आणि सार्वत्रिक शिक्षणाची मोहीम राबबावी यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. देशाचे भविष्य  कष्टकऱ्यांच्या श्रमावर, उत्पादकतेवर अवलंबून असल्यामुळे सरकारने त्यांच्या शिक्षणासाठी वाहून घ्यायला हवे असे आग्रही मत त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्त केले. त्यामुळे सरकारलाही याबाबत अधिक गांभीर्याने विचार करणे व त्यानुषंगाने जबाबदारी स्वीकारणे भाग पडले. शिक्षण व नोकरीत मागास समाजाला आरक्षण मिळावे अशी मागणीही त्यांनी केली होती. सामाजिक व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी याची आवश्यकता त्यांनी मांडली होती. तरच समता प्रस्थापित होऊ शकेल असे त्यांचे मत होते.

**८) पंचदर्पण व सुधारणा**

लोखंडे केवळ कामगार सुधारणांचे पुरस्कर्ते नव्हते तर ते सर्वांगीण समाज सुधारणेचे पुरस्कर्ते होते. सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करताना त्यांनी आपली भूमिका विशद करण्यासाठी पंचदर्पण हे पुस्तक लिहिले. समाजस्वास्थ्य व नैतिकतेच्या अनुषंगाने त्यांनी सुधारणांची मांडणी केली. या पुस्तकात त्यांनी स्त्री शिक्षण, विवाहाचे वय वाढविण्याची, घटस्फोट अधिकार, पुनर्विवाह मान्यतेची आवश्यकता मांडली आहे. तर लग्नात होणारा अवास्तव खर्च कमी करावा व बचतीचे महत्त्व सांगितले आहे. तसेच व्यसनांपासून दूर राहण्याची आवश्यकता सांगताना व्यसनांच्या दुष्परिणामांची त्यांनी जाणीव करून दिली आहे. बालमजुरी, लिंग असमानता व जातीभेद यास त्यांचा विरोध होता. या प्रथा व विचार दूर करण्यास त्यांनी काम केले. सर्वांगीण समतेचा पुरस्कार केला. स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनातील वावराचा व त्यांना बरोबरीने अधिकार देण्याचा पुरस्कार केला. २४ एप्रिल १८९० रोजी लोखंडे यांनी महालक्ष्मीच्या रेसकोर्सवर आयोजित केलेल्या व ऐतिहासिक ठरलेल्या १० हजार पेक्षा जास्त कामगार असलेल्या सभेत दोन स्त्रियांनीही भाषणे केली. त्यांना ही संधी दिली हे महत्त्वाचे आहे. त्यांचे योगदान, क्षमता याबाबतचा असलेला विश्वास व लिंगभाव ओलांडून बघण्याची दृष्टी यातून अधोरेखित होते. तसेच स्त्री उन्नती, बंधमुक्तीसाठी ही यातून चालना मिळाली.

**९) धार्मिक एकोपा व मोहल्ला कमिटी**

लोखंडे यांनी धार्मिक एकोप्यासाठी केलेले काम आदर्श घालून देणारे ठरले आहे. १८९२ मध्ये मुंबईत दंगा उद्भवला होता. त्यावेळी लोखंडे यांचे कार्य फार मोलाचे ठरले. दंग शमविण्यासाठी त्यांनी अविरत काम केले. बाधितांना धीर दिला. गल्लोगल्ली फिरून लोकांना शांत केले व कामावर जाण्यासाठी प्रोत्साहित केले. दंगलग्रस्त लोकांना रिलीफ फंडातून मदत देऊ केली. समाजातील बंधूभाव टिकावा, वाढवा यासाठी काम केले. धर्माच्या आधारावर कष्टकरी समाज विभागला जाऊ नये यासाठीही त्यांनी विशेष काळजी घेतली. समाजाच्या एकोप्यासाठी ते कायम दक्ष असत. त्यासाठी सत्यशोधक समाजाच्या मदतीने राणीच्या बागेत एकोपा सभा घेतली. या सभेला साठ हजार लोक उपस्थित होते. मोहल्ला कमिटीची कल्पनाही लोखंडे यांनीच मांडली. या कमिटीनी दंगे शमविण्यात मोलाची भूमिका वठविली. या कल्पनेचा वापर आजही प्रतिकूल परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी केला जातो. दंगल काळातील त्यांच्या योगदानामुळे इंग्रज सरकारनेही त्यांचा गौरव केला.

### १०) मानवतावादी काम

१८९६ च्या शेवटी मुंबईस प्लेगची साथ पसरली होती. यात मोठ्याप्रमाणावर जीवीत हानी होत होती. त्यात कष्टकरी गरीब वस्तीतील परिस्थिती अगदीच भयावह होती. त्यामुळे अशा वर्गाला स्वत: लोखंडे मदत देत होते, सेवा करत होते. गरिबांच्या औषधोपचारासाठी त्यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने भायखळा येथे रुग्णालय (मराठा प्लेग हॉस्पिटल) सुरु केले. प्लेग ग्रस्तांची सेवा करताना त्यांना स्वत:लाही प्लेगची लागण झाली व त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

### समारोप

सुधारणा करतानाच समाजाला प्रेरणा देणे व त्यांच्यातील ऐक्यभाव वाढविण्यास लोखंडे यांनी मोलाचे काम केले. मुंबईस कामगार वस्तीत त्यांनी शिवजयंती उत्सव सुरु केला. सामाजिक सलोखा टिकविण्यातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना रावबहादूर ही पदवी देण्यात आली होती. सरकारने त्यांना जस्टिस ऑफ पीस म्हणूनही गौरविले होते. स्वातंत्र्योत्तर काळातही भारत सरकाने त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून २००५ मध्ये टपाल तिकीट प्रकाशित केले आहे. म.फुले यांचे शिष्य नारायण मेघाजी लोखंडे यांना समाज सेवा करतानाच प्लेगची बाधा झाली आणि त्यातच ९ फेब्रुवारी १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.